## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 23/12/2017 14:37

**P.S.** (पोलीस रबाळे एमआयडीसी

**State** (राज्य): महाराष्ट्र

**District** नवी मुंबई

1. **G.D. No.** (ठाणे दैनंदिनी 012
2. **G.D. Date** (ठाणे दैनंदिनी 23/12/2017 14:37 बजे
3. **G.D. Type** (ठाणे दैनंदिनी आगीची घटना
4. **Entry for (officer)** (प्रविष्टि(अधिकार्यासाठी HANUMANTAPANDURANGUBALE
5. **Case Type** (प्रकरणाचा
6. **G.D. Brief** (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):

रबाले एमआयडीसी पोलीस ठाणे अकस्मात जळित ०८/१७
मी श्री.रुपेंद्रकुमार राजेंद्रप्रसाद ओझा वय-३५ वर्ष,धंदा-नोकरी,रा-रुम.नं.सी-५,गंगोत्री अपा.,सेक्टर-०५,सीबीडी बेलापुर नवी मुंबई मों.नं.८३६९०५५६७० समक्ष पोलीस ठाण्यात हजर होवुन जबाब लिहुन देतो की,

मी वरिलप्रमाणे असुन नमुद पत्यावर १२ वर्षापासुन परिवारसह राहतो.व महापे शिळफाटा रोडवरिल आडवली-भुतवली गावाजवळील शिल हाऊस,प्लॉट नं.पी-५१,IFCI चे स्टॉक हॉल्डींग कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आणि ग्रुप कंपनी स्टॉक हॉल्डींग डी.एम.एस.लिमिटेड आणि शिल सर्व्हिसेस लिमिटेड येथे गेल्या ०५ वर्षापासुन असिस्टंन्ट मॅनेजर म्हणुन नोकरी करित आहे. माझे हाताखाली ०३ कर्मचारी आहेत.एकंदरीत वरिल प्लॉटमध्ये कॉन्ट्रॅकमध्ये काम करणारे ३०० व सरकारी काम करणारे ४०० कर्मचारी असे एकुण ७०० लोक कामास आहेत.सदर ठिकाणी महाराष्ट्रातील राष्ट्रीयकृत बँका तसेच खाजगी बँका,महामंडळ,स्थानीक स्वराज्य संस्था व वित्तीय संस्था इत्यादी की ज्यांच्याकडुन आमचे कार्यालया बरोबर अँग्रीमेंट झालेले आहेत त्यांचेकडिल सर्व प्रकारचे दस्ताऐवज भाडे तत्वावर आम्ही ठेवुन घेतो.सदर दस्तऐवज कमीत कमी तीन वर्ष ते लाईफ टाईम ठेवुन घेतले जातात.याबाबच्या नोंदी ऑपरेशन डिपार्टमेंट मध्ये सी.ओ.ओ. यांचेकडुन ठेवण्यात येतात.त्यामध्ये आय.डी.बी.आय या बँकेकडील मोठ्या प्रमाणात दस्तऐवज ठेवण्यात आलेले आहेत.त्याचे भाडे दस्ताऐवजा नुसार ठरविण्यात येते.सदर दस्तऐवजाचे सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र सेक्युरिटी बोर्ड यांचेकडुन ३० ते ३५ सेक्युरिटी गार्ड नेमलेले आहेत.आग आटोक्यात आणण्यासाठी फायरमेन सिस्टम, फायर सिलेंडर, तसेच सदर स्टॉक होल्डिंग डीएमएस वर के.बिस्वास सी.ओ.ओ. यांचे जवळुन नियंत्रण आहे.

दि.११/१२/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा.मी नेहमीप्रमाणे वरिल ठिकाणी कामावर आलो.सायंकाळी 05.30वा .च्या सु .माझे कॅबिनचे पाठीमागील भागातुन धुर येत असल्याचे दिसल्याने मी स्वता धुर कोठुन येत आहे या बाबत खात्री केली असता वरिल वेगवेगळ्या खात्याकडुन प्राप्त झालेले दस्ताऐवज ठेवलेल्या तळघरातुन धुर येत असल्याची माझी खात्री झाल्याने मी सदर बाबतची माहीती के.बिस्वास सी.ओ.ओ. यांना समक्ष भेटुन दिली.सदर वेळी कामावर कार्यरत असलेले कर्मचारी बाहेर काढले व एमआयडीसी कडील फायरब्रिगेड मार्फत धुर येत असलेल्या ठीकाणी पाण्याचे फवारे मारले सदर पाण्याचे फवारे मारण्याचे काम दिनांक 23/12/2017 रोजी पर्यंत चालुच आहे.मी व माझे सहकारी यांचे मदतीने सदर ठीकाणी जावुन खात्री केली असता त्यामध्ये खालील नमुद स्थानिक स्वराज्य संस्था व बँका यांचे दस्ताएवज जळाल्याचे निदर्शनास आलेले आहे .
1)बी.एम.सी. 2)आयडीबीआय.3)एसबीआय.4)बँक ऑफ महाराष्ट्र5)आयआयएफएल6)स्टॉक होल्डिंग 7) सिल सर्व्हिसेस इत्यादि यांचे कागदोपत्री दस्ताऐवज जळालेले आहेत.तसेच आमचे बेसमेंट , तळमजला ,पहिला माळा व दुसरा माळा यावरिल कार्यालयाचे सिलिंग ,रिटेनिंग वॉल, फ्लोअर्स, बाहेर काचेची तावदाने ,वातानुकुलन यंत्रणा, संगणक यंत्रणा ,इलेक्ट्रिक उपकरणे, फर्निचर इ.जळुन नुकसान झालेले आहे.त्याची किंमत नक्की किती आहे याबाबत मी खात्री करुन माहीती देईन.

सदरची आग कदाचीत इलेकट्रिक शॉर्ट सर्किटमुळे लागली असल्याची शक्यता आहे.सदर बाबत माझा कोणावरही संशय नाही.

7. **Subject** (विषय):

अकस्मात जळित 08/17

8. **Acts & Sections** (अधिनियम आणि कलम):

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on** (अहवाल मुद्रित केलेली 10/05/2018

**Report Printed by** (द्वारे अहवाल मुद्रित केला):
**Name** CHANDRAKANT BABANRAO
**Rank** (पद): I (Inspector)

**Signature**
**Name** CHANDRAKANT BABANRAO KATKAR
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): PBMH69064

पोलीस ठाणे अंमलदार
रबाले एम.आय.डी.सी.,
पोलीस ठाणे, नवी मुंबई.